# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २ मे, २०२२

---

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील बी.टेक. अंतिम वर्षातील ८ विद्यार्थ्यांनी गेट-२०२२ परीक्षेत यश संपादन केले आहे.

खरगपूर येथील भारतीय प्रौद्योगिकी संस्थान यांनी गेट-२०२२ या परीक्षेचे आयोजन केले होते. विद्यापीठाच्या बी.टेक. अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या निखील पाटील, स्वप्नील पाटील, संदेश कलंत्री, कृष्णा मुळे, वरद नेरकर, सुयोग गाढवे, प्रतिल झोडे आणि चैताली बारमासे या विद्यार्थ्यांनी गेट परीक्षा उत्तीर्ण केली. या विद्यार्थ्यांचा कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला यावेळी संचालक प्रा.जे.बी.नाईक, गेट परीक्षा तयारीसाठीचे समन्वयक डॉ. तुषार देशपांडे, डॉ.राजकुमार सिरसाम, डॉ.महेंद्र बारी, डॉ.जितेंद्र नारखेडे, डॉ.रवींद्र पुरी, डॉ.उज्वल पाटील आदी उपस्थित होते. आाय.आय.टी. व एन.आय.टी. मधील अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तसेच भारत सरकारच्या नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त करणेसाठी गेट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असते.

## बातमी क्र.२

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विद्यापीठाच्या विविध प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी "मुलाखत तंत्र" या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत जळगाव येथील बेंझो केमिकल्स लि.चे मनुष्यबळ व्यवस्थापक आनंद शिरगावकर यांनी मुलाखतीची पूर्व तयारी कशी करावी, मुलाखतीसाठी ड्रेसकोड, नीटनेटकेपणा, आत्मविश्वासपूर्वक उत्तरे देणे, संवाद कौशल्य तसेच आदर्श परीचय पत्र कसे तयार करावे आदी विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार, समन्वयक प्रा.रमेश सरदार व प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा यांनी व्यवस्थापन केले. शनिवारी, ३० एप्रिल रोजी ही कार्यशाळा विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात घेण्यात आली. एकूण १८० विद्यार्थी या कार्यशाळेत उपस्थित होते.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी